# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक ११/०१/२०२२

**सराईत गुन्हेगारास ९८ किलो गांजासह घेतले ताब्यात,**
**३१ लाख ७४ हजारांचा गांजा व गांजांची वाहतुक करणारे वाहन यासह तीन आरोपी अटक,**
**अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कारवाई**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारी गांजा विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता मा पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. पद्माकर घनवट सो. व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, श्री सतीश पवार यांनी वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि १०/०१/२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील वपोनि श्री सतीश पवार, सपोनि श्री प्रशांत महाले, पोउपनि श्री राजन महाडीक व पोलीस अंमलदार असे चाकण पोलीस स्टेशन हद्दीमध्ये चाकण शिक्रापुर रोडवर मौजे शेल पिंपळगाव, मौजे बहुळ त्यानंतर मौजे साबळेवाडी अशी पेट्रोलींग करुन परत येत असताना आमचेकडील पोलीस गाडी पाहुन एक पांढरे रंगाची आरटीओ क्र आरजे १४/झेड.सी./३३१० असा असलेली हुंडई कंपनीची आय- २० गाडी सुसाट वेगाने ओव्हरटेक करुन निघुन पुढे गेली. त्यामुळे सदर गाडीमध्ये नक्कीच काहितरी संशयास्पद असल्याचा वपोनि सतीश पवार व पेट्रोलींग करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना संशय आल्याने वपोनि सतीश पवार यांचे मार्गदर्शनाखाली सदर गाडीचा सिनेस्टाईल पाठलाग करुन सदर गाडी मौजे बहुळ गावचे हद्दीमध्ये अडवुन गाडीतुन दोन इसम व एक महिला यांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांची नावे

**१. चेतन हरीराजी पुरोहित, वय २९ वर्षे, रा कोहिनुर अभिमान सोसायटी, घर क्र एल ७०२, शिरगाव ता मावळ जि पुणे मुळ रा गाव कारलु तहसिल बिनमाल जिल्हा जालोर राज्य राजस्थान**

**२. कांतीलाल मांगिलाल घांची, वय २३ वर्षे, रा इंद्रमेघ सोसायटी, घर क्र ऐ ४०४, पुनावळे पुणे मुळ रा गाव पाचिठीया तहसिल मारवाड जंशन जि पाली राज्य राजस्थान**

**३. मोनिका हकिम सिंह, वय २२ वर्षे, रा रिध्दी सिध्दी अपोर्टमेंट ५०२ डलवा, नवी मुंबई मुळ रा घर क्र ४६/बी हरदेव नगर, बर्रा, कानपुर नगर राज्य उत्तरप्रदेश अशी असल्याचे सांगितले.**

यातील **अ.क्र. १ ते ३ यांचेकडे सखोल तपास केला असता त्यांचेकडे असलेली एक पांढरे रंगाची आरटीओ क्र आरजे १४/झेड.सी./३३१० असा असलेली हुंडई कंपनीची आय- २० गाडी हि अ.क्र. १ याचे मित्राची असुन सदर गाडीची पंचांसमक्ष झडती घेतली असता सदर गाडीचे पाठीमागचे सिटचे खाली साधारण दोन किलो वजनाचे चॉकलेटी प्लॅस्टीकचे सेलोटेपने पॅक केलेले १० पुडे/पाकिटे मिळुन आले तर गाडीचे डीकीमध्ये तशीच ३९ पुडे/पाकिटे असे एकुण ४९ पुडे/पाकिटे मिळुन आली. त्या पुडयांबाबत अ.क्र. १ ते ३ यांना विचारले असता ते उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यांचा अधिक संशय आल्याने सदरचे पंचांसमक्ष उघडुन पाहिले असता त्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. अ.क्र. १ ते ३ यांचेकडे मिळुन आलेल्या एकुण ४९ पुडे/पाकिटे यांमध्ये एकुण २४,७१, ०७५/- रुपये किंमतीचा ९८ किलो ८४३ ग्रॅम गांजा मिळुन आला.**

**अ.क्र. १ ते ३ यांचेकडुन एकुण ३१,७३,०७५/- रुपये किंमतीचा एकुण ९८ किलो ८४३ ग्रॅम गांजा, तीन मोबाईल व एक चारचाकी वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

अ.क्र १ ते ३ यातील इसम नामे **चेतन हरीराजी पुरोहित हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.**

**अ.क्र. १ ते ३ यांचेविरुध्द चाकण पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४९/२०२१ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(त्त)(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रशांत महाले, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.**

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री कृष्ण प्रकाश साो. मा.अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे साो., मा.पोलीस उपायुक्त, गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे साो., मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पद्माकर घनवट, श्री प्रशांत अमृतकर साो. यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतीश पवार, सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत महाले, पोलीस उप निरीक्षक श्री राजन महाडीक व पोलीस अमंलदार प्रदिप शेलार, संदिप पाटिल, अशोक गारगोटे, सदानंद रुद्राक्षे, राजेंद्र बांबळे, मयुर वाडकर, संतोष भालेराव, जिलाणी मोमीन, बाळासाहेब सुर्यवंशी, दिनकर भुजबळ, संतोष दिघे, अनिता यादव, विजय दौंडकर, प्रसाद कलाटे, दादा धस, अजित कुटे, प्रसाद जंगीलवाड, पांडुरंग फुंदे, नागेश माळी व पोपट हुलगे यांनी केली आहे.

(डॉ काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड